**प्रेस नोट ता. ११/०८/२०१९**

## ३०२ मधील फरारी आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

दिनांक २०/०६/२०१९ रोजी सकाळी ०६.०० वा. चे सुमारास मुळामुठा कॅनॉलचे शेजारी, गंगानगर, फुरसुंगी पुणे येथील मातीच्या भराव्यावर एक अनोळखी इसमास अज्ञात इसमाने, कोणत्यातरी हत्याराने अज्ञात कारणावरुन शरीरावर ठिकठिकाणी मारहाण करुन जीवे ठार मारले. त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा रजि. नं. ५८० भा.द.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्हयात यापुर्वी २ आरोपी अटक व ४ बालअपचारी ताब्यात घेण्यात आले होते. दाखल गुन्हयातील फरारी आरोपी ॠषिकेश ऊर्फ चिंटया कांबळे हा गुन्हा केल्यापासुन तो एका ठिकाणी न राहता वेगवेगळी ठिकाणे बदलुन वावरत होता. सदरच्या फरार आरोपीची तपास पथकातील कर्मचारी पो. शि. अनिल कुसाळकर यांना त्यांचे गोपनीय बातमीदाराकडुन माहिती काढली. त्यांनतर तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्याने सापळा लावुन दिनांक १०/०८/२०१९ रोजी गंगानगर फुरसुंगी पुणे येथुन ताब्यात घेवुन हडपसर पोलीस स्टेशन, गुन्हा रजि. नं. ५८० भा.द.वि. कलम ३०२ अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते, पो.शि.४७९ शाहिद शेख यांनी केली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**

**प्रेस नोट ता. ११/०८/२०१९**

## नाबालिक मुलीवर लैंगिक अत्याचार करणा-या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

दिनांक १०/०८/२०१९ रोजी सकाळी १०.३० वाजण्याचे सुमारास फिर्यादीच्या घरी कोणी नसताना फिर्यादी ही घरी एकटीच झोपले असताना फिर्यादीच्या वस्तीमध्ये राहणारा इसम नामे नितीन साबळे हा फिर्यादीच्या घरी येवुन फिर्यादी झोपेत असताना फिर्यादीचे छातीला हात लावले असता फिर्यादी झोपेतुन उठली त्यावेळी इसम नामे नितीन साबळे याने फिर्यादीचे तोंड दाबुन बळजबरीने शरीर संबंध केले. त्यानंतर सदरच्या शरीरसंबंध आईला सांगितल्यास फिर्यादीस व तिच्या आईस जीवे ठार मारुन टाकेन अशी धमकी देवुन निघुन गेला. त्याबाबत हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं. ७८३/२०१९ भादविक ३७६(१), ४५२, ३२३, ५०६, बालकांचे लैगिंक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४ व ८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरील नमूद गुन्हयातील निष्पन्न आरोपी नितीन साबळे याचा हडपसर परिसरात तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी शोध घेत असताना पो. ना. विनोद शिवले यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वर नमूद गुन्हयातील पाहिजे आरोपी नितीन साबळे हा सध्या डी. पी. रोड माळवाडी हडपसर पुणे येथे थांबले आहे. त्यानंतर सदर ठिकाणाहून मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन डी. पी. रोडवर सापळा लावुन थांबलो असताना दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नितीन साबळे येताना दिसल्याने त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो तेथुन पळून जावु लागल्याने वरील स्टाफच्या मदतीने थोडयाच अंतरावर पकडून त्यास त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव नितीन रमेश साबळे वय २९ वर्षे रा. दत्त मंदिराजवळ, माळवाडी हडपसर पुणे असे सांगितले. त्यास वरील स्टाफच्या मदतीने हडपसर पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचेकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास केला असता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याचे सांगितले तेंव्हा सदर गुन्हयात दिनांक ११/०८/२०१९ रोजी अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक शिवाजी शिंदे, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार, यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पोलीस उप निरीक्षक बांबे, सहा.पोलीस फौजदार पठाण, पो.हवा. ३८६८ औचरे, पो.हवा. ५५६२ नवले, पो.ना. ५८५३ दळवी, पो.ना. ६४८९ शिवले, पो.शि. ८६९२ शेख, पो.शि. ७५१२ चिवळे, पो.शि. ७६८४ नाळे, पो.शि. ८६६५ पवार यांनी केली आहे. सदर गुन्हयाचा तपास महिला पोलीस उप निरीक्षक बांबे करीत आहेत.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**हडपसर पोलीस स्टेशन, पुणे**